**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत**
**ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटिका व वृक्ष लागवड करणे**
**तांत्रिक व आर्थिक मापदंड,मार्गदर्शक सूचना देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन परिपत्रक क्रमांक मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.२८ /रोहयो-१
दिनांक : ५ डिसेंबर, २०११

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१, दि.१० मे, २०११

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/ फ-२, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २५.१०.२०११

## परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटिका व वृक्ष लागवड करणेबाबतचे आर्थिक व तांत्रिक मापदंड तसेच मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दिनांक १० मे, २०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१२-१३ मध्ये १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले आहे, त्याकरीता मोठया प्रमाणावर रोपे आवश्यक आहेत.

२. उपरोक्त कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी युध्द पातळीवर सुरुवात केली असून रोप निर्मितीच्या कामांना जिल्हा स्तरावर सुरवात झाली आहे. तथापि, काही जिल्हाधिकारी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वृक्ष प्रजातींच्या बियाणांबाबत अडचण निर्माण झाली आहे. आता बियांचा हंगाम नसल्याने, बियाणे गोळा करणे, इत्यादींबाबत विचारणा होत आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

अ) संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १० मे, २०११ च्या परिशिष्ट-अ, मधील रोपवाटीका दरपत्रक-१, भाग-१ मधील अ.क्र. ६ येथे बियाणे पुरवठाबाबत रुपये ५०/- साहित्य व पुरवठा म्हणून तरतूद करण्यात आली आहे. रुपये ५०/- ही १००० पिशव्यांतील बियांसाठी तरतूद आहे. यातून वृक्ष प्रजातींचे बियाणे खरेदी करावी. तसेच त्यापेक्षा जादा रक्कम आवश्यक असल्यास आकस्मिक खर्च रुपये २२१.८२ मधून जादा खर्च भागविण्यात यावा. तद्नुसार आवश्यक असल्यास अंदाजपत्रकात बदल करावा.

ब) वृक्ष प्रजातींची बियाणे खरेदी करण्यासाठी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | : | अध्यक्ष |
| २. उपवन संरक्षक, वन विभाग. | : | सदस्य. |
| ३. उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग. | : | सदस्य. |
| ४.उप जिल्हाधिकारी (रोहयो) | | सदस्य |
| ५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) | : | सदस्य सचिव. |

सदर समितीने प्रचलित नियमाप्रमाणे कार्यवाही करुन जिल्हयासाठी वृक्षप्रजातीनिहाय बियाणे गोळा करणे/खरेदी करणे यांचे दर निश्चित करावेत. दर निश्चित करतांना बियांचा स्त्रोत, बियाणांची प्रतवारी, बियांची उगवण क्षमता या बाबींचा विचार करण्यात यावा व त्याबाबत जिल्हास्तरावर लिखीत स्वरुपात मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात.

**.....२/-**

३.	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत वनीकरण करुन हरित ग्राम निर्माण करणे याबाबत मार्गदर्शक सामाजिक वनीकरण विभागामार्फत मार्गदर्शक पुस्तिका छापण्यात आली आहे. सदर पुस्तिकेतील पृष्ठ क्र. १९ वर बियाणंबाबत आवश्यक ती माहिती देण्यात आलेली आहे.

४.	.हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक संकेतांक २०१११२०८०५२४५९००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**



**(वि. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
कृषी आयुक्त, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, ( लेखापरीक्षा) मुंबई / नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/कोंकण वृत्त ठाणे.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधरण विभाग, निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१